**<u>उलटतपास वादींकरीता विधिज्ञ श्री. जी.जी. पारखे यांच्या वतीने शपथेवर</u>**

**<u>सुरु</u>**

११. हे म्हणणे खरे आहे की, मुरलीधर भिकाजी कणसे हे माझे सासरे होते. हे म्हणणे खरे आहे की, गंगुबाई आणि भागिरथीबाई या दोन्ही माझ्या सासू होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मुरलीधर यांना गंगुबाईपासून मयत बद्रीनारायण व प्रतिवादी क्र.१ ते ३ हे अपत्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, मुरलीधर यांना भागिरथीबाई पासून मयत बाळकृष्ण व मयत चंद्रकलाबाई हे अपत्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, वादी हे मयत बद्रीनारायण यांचे अपत्य आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ माझे पती आहे.

**प्रश्न** - प्रतिवादी क्र.१ यांना तुम्ही आणि प्रतिवादी क्र.१२ आशा कचरु कणसे अश्या दोन पत्नी आहेत ?

**उत्तर** - मी प्रतिवादी क्र.१ यांची कायदेशीर पत्नी आहे. प्रतिवादी क्र.१२ हिला प्रतिवादी क्र.१ यांनी तसेच आणून ठेऊन घेतले.

१२. प्रतिवादी क्र.१ पासून मला पद्माबाई नावाची मुलगी असून तिचे लग्नानंतरचे नाव पद्माबाई नारायण इग्ने असे आहे. पद्माबाई हिला सिन्नर तालुक्यातील कोळपेवाडी येथे दिलेले आहे. माझ्या नावावर मौजे मातुळठाण येथे गट नं.१३४, क्षेत्र ३ एकर २० गुंठे जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल झाल्यानंतर मी ही ३ एकर २० गुंठे जमीन दि.१३/१०/२०२१ रोजी नोंदणीकृत खरेदीखताद्वारे पद्माबाई हिच्या नावे केली. हे म्हणणे खरे आहे की, या खरेदीखताची बाब मी माझ्या कैफियत आणि पुराव्यात नमूद केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ही ३ एकर २० गुंठे जमीन मी वहीती करते आणि त्यातील उत्पन्न देखील मी स्वतः घेते.

१३. हे म्हणणे खरे आहे की, या ३ एकर २० गुंठे जमीनीचे खरेदीखत माझ्या सास-याने माझ्या नावाने केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सास-याने करुन दिलेल्या खरेदीखतामध्ये "वाटपाच्या वेळेस ही ३ एकर २० गुंठे जमीन कचरुच्या हिश्यात दयावी" असे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सास-याने करुन दिलेल्या खरेदीखतामध्ये "मोबदल्याची रक्कम माझ्या वडीलांनी दिली" असे नमूद केलेले नाही. गट क्र.१३४ मध्ये ही ३ एकर २० गुंठे जमीन कोणत्या बाजूची होती, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सास-याने माझ्या नावावर हे खरेदीखत करुन दिले त्यावेळेस त्यांचे एकत्र कुटूंब होते. हे म्हणणे खरे आहे की, जी जमीन सास-याने मला विकली ती जमीन माझ्या

सास-यांची वडिलोपार्जित मिळकत होती.

१४. मी खरेदी घेतेवेळेस सदर ३ एकर २० गुंठे जमीनीमध्ये विहीर नव्हती. त्या खरेदीखतामध्ये "सदर क्षेत्रामध्ये विहीर आहे” असे नमूद नाही. गट क्र.१३४ चे एकूण क्षेत्र मला सांगता येणार नाही. त्यावेळेस सर्व दावा जमिनी एकत्रात होत्या. सरतपासाचे शपथपत्र तयार करतांना "गट क्र.१३४ चे क्षेत्र १० हे. ४१ आर" असल्याचे मी सांगितल्याचे मी सांगू शकत नाही. गट क्र.१३४ मध्ये किती पडीत क्षेत्र आहे हे मला सांगता येणार नाही. सरतपासाचे शपथपत्र तयार करतांना "गट क्र.१३४ मध्ये १८ आर पडीत क्षेत्र" असल्याचे मी सांगितले नव्हते. मी खरेदी केलेल्या ३ एकर २० गुंठे जमिनीच्या चतुःर्सिमा मला सांगता येणार नाही.

१५. माझ्या नावावरील जमीन मी रक्कम रु.१,०००/- च्या मोबदल्यात खरेदी घेतली, असे घडले नाही. माझ्या म्हण्ण्याप्रमाणे मोबदल्याची रक्क्म रु.२,०००/- माझ्या वडीलांनी माझ्या सास-याला घरी दिले होते. माझ्या नावावरील खरेदीखतामध्ये मोबदल्याची रक्कम रु.२,०००/- असल्याचे नमूद आहे. मोबदल्याची रक्कम रु.२,०००/- होती हे दाखविणारा दस्त माझ्याकडे नाही. खरेदीखत नोंदविण्याच्या आधी मी या ३ एकर २० गुंठे क्षेत्राचा कब्जा घेतला, असे घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावावर खरेदीखत करुन देतेवेळेस माझ्या सास-याने व प्रतिवादी क्र.१ यांनी बँक ऑफ बडोदाचे कर्ज फेडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मोबदल्याची रक्कम माझ्या वडीलांनी दिल्याचे आणि सदर ३ एकर २० गुंठे क्षेत्र ही माझ्या स्वतंत्र मालकीची जमीन असल्याचे खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी कैफियत व पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.09.03 17:14:47 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०३/०९/२०२५